चलो नांदेड ! चलो नांदेड !! चलो नांदेड !!!



# भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्था

महाराष्ट्र प्रदेश

द्वारा आयोजित

# राज्यस्तरीय अधिवेशन

आणि

# रजत महोत्सव सोहळा

दिनांक- २ व ३ फेब्रुवारी २०२४

स्थळ - गुरू ग्रंथ साहीब भवन, ए.सी. हॉल,

हिंगोली गेट जवळ, नांदेड - ४३१६०१

## सस्नेह निमंत्रण

प्रति,

श्रीमान / श्रीमती ______________________

______________________

______________________

बंजारा समाजातील सर्व शासकिय/निमशासकिय/महामंडळे/खाजगी संस्थाने अंतर्गत सेवारत आणि सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी बांधव आणि भगिनिना आदरपूर्वक जय सेवालाल...

**'' तम समंदर हाम सांखला, तम हिरारी खाण,**
**वर्षे दनेर बिछडे भूलाये भाई गोत आवं हेगी पछाण ''**

आपणास विदितच आहे कि भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्था ही एक सामाजिक अग्रणी संघटना आहे. की ज्याचे कार्य संघटना स्थापन झाल्यापासुन (१९९८ पासून) अविरत चालू आहे. संत सेवालाल महाराज, महानायक वसंतराव नाईक, फुले शाहू आंबेडकर यांची विचारधारा आणि प्रेरणा घेवून समाज परिवर्तन घडवून आणण्या करिता ही संघटना राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहे.

सर्वप्रथम ही संघटना अशोधित संत सेवालाल महाराज यांचे शोधन करणे (Explored the unexplored Saint Sevalal Maharaj) चे कार्य केले आणि समाजात जागृती निर्माण केली. या संघटनेत बरेच ज्ञानी वक्ते, लेखक, प्रचारक, इतिहास जाणकार असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून संघटनेची ध्येय धोरणे समाजापर्यत पोहोचविण्याचे कार्य  अविरत चालू आहे आणि समाजावर होणाऱ्या अन्याय / अत्याचाराकरिता संघटनेतील सर्व कार्यकर्ते वेळ, श्रम, कौशल्य, बुध्दी आणि पैसा हे पंचदान सढळ हस्ते करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांना जाणिव आहे की, ही संघटना समाजाप्रती समाज ऋण भूगतान (Pay back to the society) करणारी एकमेव संघटना आहे.

ही संघटना एकाच विचारांने प्रेरित होवून एकाच उद्देशासाठी  लढणाऱ्या लोकांचा एक समुह आहे. अनेक अडचणिना सामोरे जावून ही संघटना सामाजिक क्षेत्रात वावरत आहे. म्हणून समाजात या संघटनेचे अनन्य साधारण महत्व आहे.

सार्वभौम समाजवादी धर्म निरपेक्ष समाज घडविणे, समाजाला आर्थिक, शैक्षणिक, न्यायीक हक्क कसे प्राप्त करून देता येईल, त्यानुसार सामाजिक कार्य कसे वाढविता येईल याकरिता संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश चे राज्य स्तरीय अधिवेशन आणि संघटनेला २५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे संघटनेचे रजत महोत्सव सोहळा नांदेड या ऐतिहासिक नगरित दिनांक  २ व ३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेला असुन हे अधिवेशन समाजाप्रति एक प्रेरणास्त्रोत ठरेल अशी आशा आहे.

समाजात वावरण्यासाठी समाज ऋण भूगतान करावेच लागते. आपल्या स्वत:च्या सगळ्या गरजा भागल्यावर समाजाकडे नजर वळवायलाच हवी. म्हणून समाजोन्नती करण्यासाठी आपल्याला काही ना काही हातभार लागलाच पाहिजे.त्याकरिता आपली उपस्थिती ही मौलाची ठरणार आहे. आपल्या या अधिवेशना मधून समाजात योग्य संदेश जाईल आणि समाजाला योग्य दिशा मिळेल म्हणून आपल्याला अगत्याचे निमंत्रण आहे.

या संघटनेच्या माध्यमातून संत सेवालाल महाराजांचे उपदेश आणि विविध आव्हाने स्विकारण्यात आली असुन, नविनीकरणास चालना देण्याकरिता सृजनात्मक संकल्प करण्यात येत आहे. आणि मोठ्या प्रमाणात संभावना शोधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे संघटनेच्या व्यापक आणि सर्वसमावेशक धोरणामुळे सामाजिक परिवर्तन घडण्यासाठी गती प्राप्त होणार आहे.

ही संघटना संघर्ष आणि करूणा एकत्रित जोपासुन कार्य करित आहे. आणि म्हणून नांदेड येथील राज्यस्तरीय अधिवेशनात समाजहिताचे एखादे उपक्रम, उद्दिष्ट किंवा ध्येय प्राप्तीशी निगडित समाज हिताचे ठोस निर्णय सुद्धा घेण्यात येणार आहे.

समाजात पसरलेला अंधकार दूर करण्यासाठी, समाजाला विचार कौशल्य प्राविण्य प्राप्त करून समाजातील मानसिक आणि धार्मिक गुलामगिरी नष्ट करणे हा या अधिवेशनाचा मुळ हेतु आहे. याकरिता आपापले आपसातील मतभेद दूर करून या अधिवेशनाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे काम करण्यात येईल.

भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्थाच्या ज्ञापनात (Memorandom of Association) परिशिष्ट ब नुसार संघटनेचे जे ध्येय व उद्दिष्ठे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार अत्यंत मोलाची सामाजिक कार्ये करण्यात आली आहे. जसे की, संत सेवालाल महाराजाचे जन्मस्थळ शोधणे, समाजातील सामुहिक विवाह मेळावे, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण या पुस्तकावर बंदी आणणे, हिंदू जगण्याची समृध्द अडगळ या पुस्तकावर आक्षेप नोंदविणे, बोगस राजपुत भामठा घुसखोरी संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करणे, आरक्षणा संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात यांचीका दाखल करणे, क्रिमीलेअर अट रद्द करण्याकरीता पाठपुरावा करणे, जाती निहाय जनगणना करण्याबाबत, महानायक वसंतराव नाईक स्मृती विशेषांकाचे प्रकाशन, वाचनालय, रूग्णवाहिका, विद्यार्थी दतक योजना, रक्तदान शिबिरे, महापुरूषांचे जयंती –

पुण्यतिथी, मेळावे संम्मेलने, मोर्चे, निदर्शने, आंदोलने आणि पदाधिकारी/ कर्मचारी यांचे प्रश्न निकाली काढणे, तांड्याना ग्राम पंचायतचा दर्जा देणे, विमुक्त जाती प्रर्वगातील सर्व रिक्त पदे भरणे, भारतातील संपूर्ण बंजारा समाजाला अनुसुचित जमाती मध्ये आरक्षण देणे, लोक संख्येच्या आधारावर पंचवार्षिक योजनेत आर्थिक तरतुद करने, इत्यादी अनेक बाबीवर संघटना कार्य करित आहे.

आणि भविष्यात सुद्धा भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्थाच्या माध्यमातून एक सामाजिक अध्ययन दल (Study Task Force) स्थापन करून भारतातील विभिन्न तांड्याचा दौरा करणे, प्रत्येक राज्यात बंजारा समुदायाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे, इतिहास शोधन करणे, भारतातील सर्व बंजारा समाज एका सुचित समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव तयार करणे, दैविता आणि पवित्रता (Divinity and Sacredness) कसे कमी करता येईल यावर संशोधन करणे इत्यादि अनेक मुद्यावर संघटना कार्य करणार आहे.

या सर्व बाबीसाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे. त्या करीता आपल्याला सामाजिक अंतराभिसराणाच्या माध्यमातूनहि जावे लागेल आणि विशेष सामाजिक वातावरण (Special Social Environment) तयार करून त्यातुन सृजनशिल समाज निर्माण करू शकू. तेव्हा या अधिवेशनाचे खरे सार्थक होईल असे आपण समजू शकतो.

तरी हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी आपण या अधिवेशनास अगत्याने उपस्थित राहाण्यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण आपणास देण्यात येत आहे. आणि नम्र विनंती करण्यात येत आहे.

जय सेवालाल जय वसंत जय संविधान

❊ आपले विनित ❊

भारतीय बंजारा समाज कर्मचारी

सेवा संस्था

www.bbskss.org | bbskss2020@gmail.com